श्रीम हासे सविता बबन, आरोग्य सेवक महिला,
यांची विशेष बाब विनंती बदली बाबत

अहिल्यानगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-४६११/२०२५
अहिल्यानगर दि.०४/०९/२०२५

वाचा:- १.शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेडील शासन निर्णय क्र.जिपब४१४/प्र क्र ११२/आ-१४ दिनांक १५ मे २०१४
२. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरोग्य/आस्था-४/३९८/२०२५ दि.१९/०५/२०२५
३. श्रीम हासे सविता बबन, आरोग्य सेवक महिला, यांचा विनंती अर्ज दि.२५/०७/२०२५
४.वैदयकीय अधिकारी, प्रा आ केंद्र खिरविरे, ता अकोले यांचेकडील पत्र क्र.आरोग्य/आस्था-१८७/२०२५ दि.२८/०७/२०२५
५. या कार्यालयाकडील पत्र क्र.आरोग्य/आस्था-५/३३८/२०२५ दि.०१/०८/२०२५
६.मा अपर आयुक्त,(आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय , नाशिक यांचेकडील पत्र क्र विआशा/आस्था-४/ दि.१९/०८/२०२५

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ अन्वये श्रीम हासे सविता बबन, आरोग्य सेवक महिला, यांची प्रशासकीय कारणास्तव बदली बिगर आदिवासी क्षेत्र उपकेंद्र गणोरे, प्रा आ केंद्र देवठाण ता अकोले, येथून आदिवासी क्षेत्र उपकेंद्र एकदरा, प्रा आ केंद्र खिरविरे, ता अकोले, येथे करणेत आली होती. सदर आदेशाविरुध्द मा विभागीय आयुक्त, नाशिक, विभाग नाशिक यांचेकडे अपील केलेले होते.

संदर्भ क्र.४ अन्वये वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खिरविरे, ता अकोले यांचेकडील प्राप्त अहवालानुसार आरोग्य सेवक महिला यांच्या बदल्याबाबतची माहिती विहित प्रपत्रात मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, कार्यालयाकडे सादर करण्यात आली होती.

संदर्भ क्र.६ अन्वये शासन निर्णय दि.१५/०५/२०१४ मधील प्रकरण नियम ८ (१०) नुसार श्रीम हासे सविता बबन, आरोग्य सेवक महिला, यांचे विनंती बदलीचा कालावधी कमी करुन मान्यता देणेत आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | बदलीपूर्वीचे ठिकाण | | | बदलीनंतरचे ठिकाण | | | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपकेंद्र | प्राआकेंद्र | तालुका | उपकेंद्र | प्राआकेंद्र | तालुका | |
| 1 | 2 | 3 | | | 4 | | | 5 |
| 1 | श्रीम हासे सविता बबन, | एकदरा | खिरविरे | अकोले | सायखिंडी | जवळेकडलग | संगमनेर | विनंती |

वरिल कर्मचा-याचा बदलीचा आदेश खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

१. आदेशात नमुद कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दि.०४/०९/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.
२. संदर्भ क्र.१ मधील प्रकरण-१ मुददा क्र.७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक०४/०९/२०२५ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजु न झाल्यास, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणुन गणला जाईल.
३. संबंधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.
४. सदर बदली विनंती कारणास्तव केलेली असल्याने संबंधितांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक 20250904100226 असा आहे.

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर